अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २०२ ■ गुरूवार दि.१० एप्रिल २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 202 ■ Thursday Dt.10 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

## वक्फवर नियंत्रण गरजेचे होते : प्रकाश महाजन

मुंबई । प्रतिनिधी

गेल्या अनेक दिवसांपासून वक्फ बिलावरून मोठा गदारोळ होत आहे. वक्फवरून मुस्लिम नेत्यांसह उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचा या बिलाला मोठा विरोध होत आहे. वक्फ बोर्डाच्या जमिनींसह सर्व देवस्थानच्या जमिनी मोदी सरकार आपल्या उद्योगपती मित्रांना देत असल्याचा आरोप केला जात असताना मनसेचे नेते प्रकाश महाजन (झीरड्ढरीह चरहरक्षरप) यांनी वक्फ बिलात सुधारणा होणं फार महत्त्वाचं होणं आवश्यक असल्याचं म्हटलंय. त्यांनी खासदार संजय राऊत आणि उद्धव ठाकरेंनाही चांगलंच फटकारलं आहे.

वक्फ बोर्डाच्या बिलामध्ये सुधारणा होणं फार आवश्यक होतं. वक्फ बोर्डवर कोणाचेही नियंत्रण नव्हते. वक्फने ही जागा आमची आहे असे सांगितले तर भारतात कुठेही न्यायालयात दाद मागू शकत नाही. वक्फ बोर्डच्या ट्राबनलकडे जावे लागायचे जाग्यावर ताबा घेणारे वक्फ बोर्ड आणि आपण त्याच्यावर बाजू मांडायची, हे अत्यंत चूक होते. असंही ते म्हणालेत. तामिळनाडूमध्ये त्रिसलापल्लीमध्ये दीड हजार वर्षांपूर्वी चे मंदिर ती प्रॉपर्टी आमची सांगितली करण अकडच्या नावाने त्यांना डोनेट केले. इस्लामचा जन्म होण्याच्या पाच सहाशे वर्षे अगोदर जे गाव त्या ठिकाणी अस्तित्वात आहे. मंदिर अस्तित्वात आहेत ती वक्फ बोर्डाची प्रॉपर्टी होती. कशी मला या गोष्टीचे वाईट वाटले की कुठल्याही पक्षाचा मुस्लिम खासदार सरकारने आणणाऱ्या बिलाविरुद्ध यांनी मतदान केलं. त्यांच्यासोबत १९६ हिंदू खासदारांनी ही विरोधात मतदान केले. धक्का मला बसला. पंजाबमधल्या सगळे अकाली दल असो किंवा कॉँग्रेस या खासदारांनी वक्फ बोर्डच्या बिलाच्या विरुद्ध मतदान केले, असे महाजन म्हणाले.

# देशमुख हत्याप्रकरणी स्वत:चे पाप झाकण्यासाठी वाल्मिक कराडची थेट निर्दोषाची विनवणी!

## कराडचा अजब दावा, 'मी निर्दोष आहे मला सोडा', कोर्टात केविलवाणी मागणी

- सरपंच स्व. संतोष देशमुख यांना आरोपींनी केलेल्या मारहाणीचा व्हिडिओ न्यायालयात सादर
- हा व्हिडिओ सार्वजनिक झाला तर राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो?
- प्राथमिक पुरावा नसल्याने वाल्मिक कराड यांनी केला निर्दोष मुक्ततेसाठी अर्ज दाखल
- स्व. संतोष देशमुखांच्या हत्येशी माझा संबंध नाही; वाल्मिक कराडने ऐनवेळी केले हात वर!

बीड । प्रतिनिधी

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाची आज विशेष मकोका न्यायालयात सुनावणी पार पडली आहे. या सुनावणीसाठी सरकारी वकील उज्वल निकम उपस्थित होते. सरपंच संतोष देशमुख यांची ४ महिन्यापूर्वी अपहरण करून निर्घृणपणे हत्या करण्यात आलेली होती. त्यानंतर अनेक धक्कादायक खुलासे समोर आले होते. या प्रकरणाचा खटला सध्या बीडच्या जिल्हा सत्र न्यायालयात सुरू आहे. त्यावर आज विशेष मकोका कोर्टात सुनावणी पार पडली आहे. आज ११ वाजता ही सुनावणी पार पडली आहे. त्यासाठी सरकारी वकील उज्वल निकम हे काल रात्रीच बीडमध्ये दाखल झालेले आहेत.



संतोष देशमुख यांच्या हत्येशी किंवा अवादा कंपनीकडे मागण्यात आलेल्या खंडणीशी माझा काहीही संबंध नाही. मी निर्दोष आहे, त्यामुळे मला सोडावे असे म्हणत या प्रकरणातील क्रमांक एकचा आरोपी असलेल्या वाल्मिक कराडने हात वर केले आहेत. आज (१० एप्रिल) या प्रकरणातील तिसरी सुनावणी पार पडली. यावेळी कराड याने निर्दोष मुक्ततेसाठी अर्ज दाखल केला असल्याची माहिती, विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी दिली.


आजची सुनावणी पार पडल्यानंतर ॲड. निकम यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, आरोपी क्रमांक एक म्हणजे वाल्मिक कराडने खटल्याशी संबंधित कागदपत्रांची मागणी केली होती. ही सगळी कागदपत्र आम्ही सीआयडीमार्फत न्यायालयाला सादर केली आहेत. काही दस्तवेज सीलबंद असल्यामुळे ते सील उघडल्यानंतरच त्याच्या प्रती देण्यात याव्यात अशी विनंती न्यायालयाला केली आहे. याचवेळी वाल्मिक कराडने निर्दोष मुक्ततेसाठी अर्ज केल्याचे निकम यांनी सांगितले.



वाल्मिक कराडने एक अर्ज दाखल केला आहे. यात त्याने स्वतःला निर्दोष असल्याचे म्हटले आहे. या खटल्यातून मला मुक्त करावे, कारण माझ्याविरुद्ध कोणताही प्राथमिक पुरावा नाही, खून किंवा खंडणीप्रकरणाशी माझा काहीही संबंध नाही, असा अर्ज कराडने केल्याचे ॲड. निकम यांनी सांगितले. त्यावर न्यायालयाने सीआयडीला आपलं म्हणणं मांडण्यास सांगितले आहे. येत्या २४ तारखेला म्हणणं न्यायालयात सादर केले जाणार आहे. त्यावर सुनावणी होईल, दोन्ही बाजूने युक्तिवाद होतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### सर्व आरोपींची संपत्ती जप्त करण्यासाठी अर्ज

खून आणि खंडणी प्रकरणाशी आपला संबंध नाही, असे सांगून यातून सुटण्याचा वाल्मिक कराडचा केविलवाणा प्रयत्न सुरु आहे. पण मकोका कायद्यांतर्गत सर्व आरोपींची संपत्ती जप्त करण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. यात वाल्मिक कराडचीही संपत्ती जप्त करण्यासाठी अर्ज केला आहे. ही संपत्ती जप्त करण्याचे आदेश द्यावेत अशी विनंती न्यायालयाला करणार असल्याचे निकम यांनी सांगितले. या प्रकरणाची पुढील सुनावणी २४ एप्रिल रोजी होणार आहे.





## गायरान जमिनीवर ताबा घेण्याचा प्रयत्न

### आंदोलनकर्त्यांनी घेतले विषः जमिनीच्या हक्कासाठी ७० दिवसांपासून सुरु होते आंदोलन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील जवळगाव येथील गट नं. २११ वरील सरकारी जमीन भूमिहीन शेतकरी १९८१ पासून वहिती करतात. या जमीनीवर सोलार प्लॅन्ट होत आहे. गंगा माऊली सोलार प्रा. लि. कंपनी सोबत केलेला करार रद्द करून प्रकल्प स्थालांतरीत करावा या मागणींठी शेतकरी मागील ७० दिवसापासून जवळगाव या गावी बेमुदत धरणे आंदोलन सुरु केले आहे.

हे आंदोलन चिरडण्याच्या उद्देशाने सोमवारी (दि. ८) पोलिस बळाचा वापर करीत झोपड्यांवर घटनेच्या निषेधार्थ जेसीबी चालवली. या बाळासाहेब शेषेराव हारे, माणिक विठोबा आगळे, विजय लिबाजी कांबळे व श्रीमती पलंका रमेश तारळकर चार गायरानधारक शेतकऱ्यांनी विष प्राशन केले. या शेतकऱ्यांना येथील स्वाराती शासकीस रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृत्ती गंभीर आहे. तर इतर शेतकऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दरम्यान युवा आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अशोक पालके यांनी तातडीने विष प्राशन केलेल्या गायरान धारक शेतकऱ्यांची रुग्णालयात जाऊन भेट घेत त्यांना तातडीने उपचार देण्याची विनंती डॉक्टरांनी केली. तसेच या घटनेचा निषेध नोंदवला आहे.

## चौसाळा ग्रामीण रुग्णालयासाठी माजी मंत्री क्षीरसागर यांचे प्रयत्न कामी आले

बीड । प्रतिनिधी



गेल्या चार वर्षापासून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी चौसाळा ग्रामीण रुग्णालयाच्या निधी मंजुरीसाठी आणि जागा उपलब्धतेसाठी सातत्याने प्रयत्न केले आणि त्यामुळेच आज २४ कोटी ४५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती चौसाळ्याचे सरपंच बाबुशेठ लोढा यांनी दिली आहे

चौसाळा येथे ग्रामीण रुग्णालय सर्व सोयीनीयुक्त व्हावे यासाठी चौसाळ्याचे सरपंच बाबुशेठ लोढा यांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता त्यानुसार माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी चार वेळा बैठका घेऊन तात्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांना याबाबत तातडीने पावले उचलण्यास सांगितले त्यानुसार जिल्हाधिकारी मुधोळ यांनी देखील मोठे सहकार्य केले. त्यांच्या कार्यकाळातच ग्रामीण रुग्णालयासाठी जागा उपलब्ध करण्यात आली त्यानंतर या ठिकाणी निधी मंजूर करण्यासाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी मंत्रालयात राज्याचे आरोग्य मंत्री, संबंधित खात्याचे सचिव, तसेच ओम प्रकाश शेटे यांच्याकडे सातत्याने याबाबत पाठपुरावा केला. त्यानुसार या रुग्णालयाच्या उभारणीसाठी २४ कोटी ४५ लाख रुपये निधी मंजूर झाला असून चौसाळा आणि परिसरासाठी हे रुग्णालय उपयुक्त ठरणार असल्याचे सरपंच बाबुशेठ लोढा यांनी सांगितले या रुग्णालयासाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या प्रयत्नामुळेच जागा आणि निधी मिळाला असल्याचेही ते म्हणाले.

## सप्तश्रृंगी गडावर चेंगराचेंगरीची परिस्थिती

### गर्दीचे नियोजन हुकले, पोलिसांची तारांबळ



नाशिक । प्रतिनिधी

चैत्रोत्सवानिमित्ताने सप्तशृंगी गडावर भाविकांची गर्दी झाल्यामुळे चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली. आदिमायेचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी झाल्याने गर्दीचे नियोजन चुकले. त्यामुळे पहिल्या पायरीजवळ चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली. यामुळे प्रशासन आणि पोलिस व्यवस्थेची मात्र धावपळ झाल्याचं दिसून आलं. चैत्रोत्सवानिमित्ताने सप्तशृंगगडावर आदिमायेचे दर्शनासाठी बुधवार रात्रीपासून भाविकांची मोठी गर्दी झाली आहे. अचानक वाढलेल्या संख्येमुळे सप्तशृंग गडाच्या पहिल्या पायरीजवळ चेंगराचेंगरी सदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. भाविकांच्या या गर्दीमुळे मंदिर प्रशासन, पोलिस आणि आपत्ती व्यवस्थापनाची मात्र तारांबळ उडाली आहे.

लहान मुले, महिलांना मोठा त्रास

आदिमायेचे दर्शन सुलभ व्हावे म्हणून दर्शन मार्गात बॅरिकेड्स लावण्यात आले होते. मात्र काही ठिकाणी बॅरिकेड्स तुटल्याने चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली. परिणामी लहान मुले, वयोवृद्धांना त्रास सहन करावा लागला. गर्दीचे नियोजन न झाल्याने भाविकांनी पोलिस आणि सप्तशृंग गड व्यवस्थापन विरोधात नाराजी व्यक्त केली. उत्साही भाविकांनी आदिमायेचा गजर करत अंबे माता की जय च्या घोषणांनी संपूर्ण गड परिसर दुमदुमून टाकला. मात्र भाविकांच्या वाढलेल्या या गर्दीमुळे भवानी चौकातील व्यापाऱ्यांचे व्यवहार ठप्प झाल्याचं दिसून आलं.

नियोजनासाठी बैठका, पण अंमलबजावणी नाही

सप्तश्रृंगी गडावर सध्या चैत्रोत्सव सुरू आहे. गुढीपाडव्यापासून सुरू झालेला हा उत्सव हनुमान जयंतीपर्यंत सुरू असतो. गेल्या दोन ते तीन दिवसांपासून या ठिकाणी राज्यभरातून मोठ्या प्रमाणात भाविक येत आहेत. या गर्दीचे नियोजन करण्यासाठी प्रशासनाने दोन ते तीन बैठका घेतल्या असल्या तरी निर्णयांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी केली जात नाही. त्यामुळे वाढलेल्या गर्दीचे नियोजन करणे आवश्यक असताना प्रशासन कुठेतरी कमी पडतंय का असं वाटतंय.

# पैसेअभावी उपचार नाकारणाऱ्या रुग्णालयांची मान्यता रद्द का करण्यात येऊ नये

## शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान मोरे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर

बीड । प्रतिनिधी

जगाच्या पाठीवर सर्वाधिक विश्वास कोणावर असेल, तर तो डॉक्टर आहे. डॉक्टर कोणताही रुग्ण आला की, भेदभाव करीत नाही, रंग बघत नाही, त्यांचा वंश बघत नाही. डॉक्टर मध्ये प्रचंड संवेदनशीलता, सहनशीलता आणि नितीमत्ता असते. त्यामुळे त्याला कोणताही शत्रू नसतो. डॉक्टर निर्मिकाचे दुसरे रूप असते. मात्र काळ बदलतो तशीच वेद्कीय क्षेत्राबाबतचे संदर्भ बदलताना दिसतात. पूर्वीचे डॉक्टर रुग्ण बरा झाला पाहिजे, यासाठी औषध देत होते. मात्र संवेदनशीलता गांजत चाललेल्या काळात वेदकीय व्यवसाय आता बक्कळ पैसा बघत आहे. प्रत्येकाला व्यवसाय करण्याचा अधिकार आहे; पण आजची रुग्णालये बघितली तर मरण स्वस्त होत आहेत? काही डॉक्टर आणि रुग्णालय अपवाद असतील, तरीही या व्यवसायाचा विश्वासाला तळा जाताना दिसत आहे. पुण्याच्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात पैशांअभावी उपचार नाकारल्याचा प्रकार समोर आल्यानंतर संतापाची लाट उसळली आहे.

महाराष्ट्र सरकारनेही चौकशीचे आदेश दिले आहे. हा रुग्णालयातील प्रकार प्रतिनिधिक स्वरूपाचा नाही काय? तनिषा सात महिन्यांच्या गर्भवती होत्या आणि त्यांना रक्तस्राव होत होता. रुग्णालयात त्यांना उपचारासाठी दाखल केल्यानंतर मंगेशकर रुग्णालयाच्या प्रशासनाने त्यांच्या कुटुंबांना १० लाख रुपये भरले, तरच उपचार केले जातील, ते सांगण्यात आले. तनिषा कुटुंबीयांनी अडीच लाख रुपये भरतो, सांगितल्यानंतरही रुग्णालय प्रशासनाने नाकार दिला. त्यामुळे त्यांना दुसऱ्या रुग्णालयात हलविण्यात आले; परंतु रक्तस्राव वाढतच होता. दुसऱ्या रुग्णालयात त्यांनी दोन गोंडस मुलांना जन्म दिला; पण प्रचंड रक्तस्त्रावाने तनिषाच्या करून अंत झाला. दुर्दैवी घटना अमानवीय आणि संवेदनांच्या चिंधड्या करणारी नाही काय? रुग्णालय पैसा कमविण्याचे साधन की, त्याच्या जीव वाचवण्यासाठी आहे. मृत महिलेला वेळीच उपचार मिळाले असते तर प्राण गमवावा लागला नसता. मात्र त्यांचा मृत्यू वेद्कीय क्षेत्रातील आर्थिक अराजकाचे प्रतीक नाही काय? सत्तास्थानी असलेल्या एक आमदाराच्या स्वीय सहाय्यकाच्या पत्नीलाच अशा व्यवस्थेत बळी घ्यावा लागत असेल, तर सर्वसामान्यांच्या परिस्थितीचा विचार करता येईल काय? खासगी हलगर्जीपणा, हेळसांड होत असेल तर या रुग्णालयावर नियंत्रणाची गरज नाही काय? कोणतेही रुग्णालय एखाद्याच्या मालकीचे असेल, तरी आरोग्याची सेवा ही सार्वजनिक आहे. त्यामुळे रुग्णालयातील मालकशाही उध्वस्त करण्याची गरज आहे. विशेषतः सरकारच्या एक रुपया लीजवर असलेल्या रुग्णालयाने सहा वर्षापासून २७ कोटींच्या महापालिकेचा कर भरलेला नाही. संताप वाढलेला बघून 'आमची मान शरमेने खाली गेली,' अशी उपरती व्यवस्थापनाला झाली;





पण हा प्रकार होत असताना व्यवस्थापन झोपले होते काय? राज्यात गेल्या काही वर्षात आरोग्याच्या व्यवस्थेत सुधारणा होत आहे. शासकीय रुग्णालयात जाणाऱ्यांची संख्या वाढलेली आहे. मात्र रुग्णांची संख्या अधिक आणि डॉक्टरांची अल्प संख्या आरोग्यांच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. शासकीय रुग्णालयाच्या इमारती बांधल्या आहेत. यंत्रसामग्री, औषध आहे; पण कर्मचारी नाही. लोकसंख्येच्या प्रमाणात डॉक्टरांचे प्रमाण किती?

रुग्णालयांची संख्या वाढते ही चांगली गोष्ट आहे. कारण गरीब, निराधारांना तोच एकमेव आधार असतो. मात्र एकदा गरीब शहरातील खासगी रुग्णालयात उपचार घेऊ शकतो काय? अनेकदा रुग्णालयात जाण्यासाठी अन्य डॉक्टरांचे औषध, शुल्क भरण्यासाठी पैसे नसतात. तो स्वतःचे दुःख आणि वेदना आत्माभगनासह भोगत असतो; पण रुग्णालयाचे नाव घेत नाही. अशी माणसं अखेरचा श्वास घेण्यातच धन्यता मानतात, हे सत्य कोणालाही नाकारता येणार आहे काय? पुण्याच्या रुग्णालयात ज्या गर्भवती महिलेचा मृत्यू झाला तिलाही पैशांअभावीच उपचार नाकारण्यात आले. ती तनिषा एकच नाहीतर सर्वत्र घेतला तर केवळ अर्थप्राप्तीसाठी उभ्या असलेल्या रुग्णालयाच्या भिंती हसतात. रुग्णालयातील चांगले उपचार होतात; पण लोकांचा ओढा कायम खासगीकडे असतो; परंतु नावाने मोठी असलेली रुग्णालय पैसा छापणाऱ्या मशीन बनलेल्या आहेत. रुग्णालयाची गरज आहे, एक समस्या बनत असेल तर या सामाजिक आरोग्य जपणार कोण? पैशाअभावी उपचार नाकारणारे मंगेशकर रुग्णालय हे एकमेव नाही. सरकारने खासगी रुग्णालयाचे ऑडिट केले तर राज्यात हजारो रुग्णालय सापडतील. खासगी रुग्णालयांची स्थापनाच आर्थिक भराभटीसाठी आलेली आहे.

पैसे कमी जातात म्हणून मृतदेह देण्यास नकार देणारी रुग्णालय... रुग्णा बरा झाल्यानंतरही केवळ लाखोंच्या मिळकतीसाठी बेडवर होणारी रुग्णालय रुग्णांच्या हिताची ठरू शकतात काय? रुग्णालयांच्या स्थापनेमागील करण्याचा शोध घेतला तर रुग्णांच्या प्राणापेक्षा पैशाला किंमत आली आहे.

रुग्णालये भांडवलशाहीकडे वळत असून सामाजिकतेचा ऱ्हास होत आहे. सामाजिकतेजा ह्रास म्हणजे जिवंतपणाचे अवमूल्यनच नाही काय? आरोग्याच्या बाबतीत कोणासोबतही भेदभाव केला जाऊ नये; पण ही आर्थिक शोषणाची नवी व्यवस्था उभी होत असेल, तर पुण्याच्या खासगी गडचिरोलीचे जिल्हा रुग्णालय चांगले नाही काय? हा जिल्हा रुग्णालयासारखे रुग्णालय असेल, तर कोणत्याही रुग्णाला खासगी रुग्णालयात जावे लागणार नाही? दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या चौकशीनंतर अहवाल येणार आहे? मात्र पारदर्शकता आणि निष्पक्षता राहणार आहे काय? रुग्णालयातील डॉक्टर दोशी आढळले तर त्यांच्यावर कारवाई होईल; पण मान्यतेचे काय? पैशाअभावी उपचार नाकारणाऱ्या रुग्णालयांची मान्यता रद्द का करण्यात येऊ नये? राज्यातील अनेक रुग्णालय रुग्णांच्या नावावर शासकीय रक्कम लाटतात, हे खरे नाही काय? रुग्णालया विरोधात संतापाची लाट उसळली; पण हा संताप नव्या तनिषांचा मृत्यु रोखणार आहे काय? हा प्रश्न संपणार नाही!!

# भोजगाव-कोमलवाडी ग्रामपंचायतीच्या फेर सरपंचपदी मीना गायकवाड विराजमान!

## जात प्रमाणपत्रामुळे अपात्र ठरलेल्या मीना गायकवाड यांना मिळाला पुन्हा सरपंच पदाचा मान

### फेरनिवडीबद्दल गावकऱ्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव पाहायला मिळाला

**नवनाथ आडे । गेवराई**

महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणात जात प्रमाणपत्र वेळेवर दाखल न केल्यामुळे सरपंच, उपसरपंच सदस्य यांच्यावर अपात्रतेची कारवाई करण्यात आली होती. यासंदर्भात मंत्रिमंडळाने निर्णय घेऊन अपात्र ठरलेल्या सदस्यांना सरपंचांना एक वर्षाची मुदत वाढ दिली आहे.

सरपंच व उपसरपंच यांना अपात्र करू नये, अशी मागणी सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राच्या सर्व शिलेदारांनी केली होती. तसेच विधानसभेच्या अनेक लोकप्रतिनिधींनी या प्रश्न मुदतवाढ करावी यासाठी आवाज उठवला होता. सरपंच परिषद मुंबई यांच्या लढ्याला यश आले आहे. दत्ताभाऊ काकडे यांनी पाठपुरावा करत सरपंच व उपसरपंच यांच्यावर होणारी कारवाई स्थगित केली आहे. सर्व सरपंचांना एक वर्षाची मुदत वाढ देऊन एक दिलासादायक निर्णय शासनाने घेतला. भोजगाव- कोमलवाडी ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच मीनाताई डिगांबर गायकवाड या जात प्रमाणपत्रामुळे अपात्र ठरल्या होत्या. या निर्णयामुळे त्यांची प्रशासकीय फेरनियुक्ती सरपंच पदी झाली. आत्ताच झालेल्या ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करताना जात प्रमाणपत्र न दिल्यामुळे अपात्र ठरविण्यात आले,



पण् आयुष्याच्या वळणावर चढ -उतार येत असतात. असाच उतार या उमेदवारांच्या प्रक्रियेत पाहायला मिळाली. शिल्लक कारणावरून एक गावचा लोकप्रतिनिधी अपात्र ठरेल, असं कदाचित कोणाला वाटलं नव्हतं पण विरोधकांच्या राजकीय आणि प्रशासकीय यंत्रणेत वचक असल्यामुळे या गोष्टी घडल्या असाव्यात, असे मत गावातील लोकांनी त्यावेळी व्यक्त केले होते. पण उशिरा का होईना, सत्यता समोर आली आणि देवदैवतांनी पुन्हा एकदा गावकऱ्यांची सेवा करण्याची संधी दिली. याच संधीचे सोने करून गावाला सुदृलम-सुपलम करावे अशी मनरूपी ध्येयजोपासून परत गाव विकासाच्या धोरणाकडे नेण्यासाठी प्रयत्न करू आणि या कर्तव्यदक्ष निवडीबद्दल गावकऱ्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव झाला आहे.

# क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती महोत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे : अजिंक्य सुरवसे

## जयंतीनिमित्त जिल्ह्यामध्ये प्रथमच चित्ररथाचे आगळे वेगळे आयोजन

बीड / प्रतिनिधी

महिला शिक्षणाचे आद्यजनक, दलितांच्या व्यथा मांडून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी



अहोरात्र परिश्रम करणारे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती शुक्रवार दि. ११ एप्रिल २०२५ रोजी समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते, राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगनरावजी भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात मोठ्या उत्साहात साजरी होत आहे . यावेळी जिल्ह्यामध्ये प्रथमच चित्ररथ मिरवणूक देखील आयोजित करण्यात आलेली या चित्ररथ यात्रेच्या माध्यमातून क्रांतीसुर्य महात्मा फुले यांचा जीवन संघर्ष आढावा तमाम फुले प्रेमींसाठी तसेच सर्वसामान्यांसाठी एक आदर्श दाई उपक्रम या चित्ररथ मिरवणुकीच्या माध्यमातून ठरला जाणार आहे. फुले जयंती जिल्ह्यात देखील ठीकठिकाणी, गावा-गावात, घरा-घरात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करावी असे आवाहन अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सचिव ड.सुभाष राऊत यांनी केले आहे. बीड शहरामध्ये मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या या जयंती महोत्सवाचे साक्षीदार तमाम ओबीसी बहुजन बांधवांनी व्हावे असे आवाहन सार्वजनिक जयंती महोत्सवाचे अध्यक्ष सुरवसे यांनी केले आहे.

प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती बीड शहरामध्ये समता परिषदेच्या माध्यमातून साजरी होत असून सकाळी नऊ वाजता क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्याजवळ, डीपी रोड, सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स, बीड




या ठिकाणी अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तर सायंकाळी चार वाजता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. दरम्यान तत्पूर्वी दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ०९:०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून समता ज्योत काढण्यात येणार असून क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले पुतळ्याजवळ या समता ज्योत रॅलीची सांगता होणार आहे. समता ज्योत रॅलीमध्ये फटाक्यांची आतिषबाजी करण्यात येणार आहे.


तरी महात्मा फुले समता परिषदेचे पदाधिकारी, ओबीसी समाजातील विविध संघटनेचे पदाधिकारी, समता सैनिक, फुले प्रेमी, बंधू-भगिनींनी आणि युवक युवतींनी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित सर्व उपक्रमांना उपस्थिती लावावी असे आवाहन सार्वजनिक महात्मा ज्योतिबा फुले जयंती महोत्सवाचे अध्यक्ष अजिंक्य सुरवसे यांनी केले आहे.

**चित्ररथ मिरवणूक जयंतीचे मुख्य आकर्षण**

क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले जयंती मोहत्सवानीमित्त चित्र रथ मिरवणूकीचे बीड जिल्ह्यात प्रथमच जयंती निमित्त आयोजन केले गेले आहे. या मिरवणुकी वेळी महामंवांच्या जिवनकार्यावर आधारित चित्र रथ मिरवणूक काढण्यात येत आहे. क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांनी त्यांच्या जिवनात केलेल्या प्रमुख कार्यापैकी मुलींसाठी शिक्षणाची जी दारे खुली केली त्या कार्यावरती आधारित भव्य दिव्य चित्रीत असा देखावा उभारण्यात येत आहे तो या मिरवणुकीचे आकर्षण असणार आहे.

# उद्योजक तथा नेशन बिल्डर; महात्मा जोतीराव फुले

(कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (उड्ळ) कंपन्याचे सामाजिक उत्तरदायित्व फंड या संकल्पनेचे व विचारांचे जनक, स्त्रियांचे आणि अस्पृश्यांचे कैवारी, समता आणि मानवतेचे पाईक, सामाजिक क्रांतीचे जनक, आघाडीचे उद्योजक, शेअर मार्केटचे अभ्यासक, कृषी व अर्थतज्ञ, क्रांतीबा महात्मा जोतीराव फुले यांची आज १९८ वी जयंती. यानिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन...!)



महात्मा जोतीराव फुले हे केवळ समाजसुधारक वा शिक्षणक्रांतीचे जनकच नव्हे, तर ते दूरदृष्टीचे उद्योजक, शेती व आर्थिक क्रांतीचे अग्रदूत होते. त्यांनी सुमारे दीडशे वर्षांपूर्वीच कृषीवर आधारित अर्थव्यवस्थेचा पाया रचत 'शेतीला व्यवसायाची' जोड दिली. त्यांनी सन- १८६३ साली 'पुणे कमर्शियल आणि कॉन्ट्रॅक्टिंग कंपनी' (झ्रींपश उेाशीलळरश्र । उेपींरलींळपस उेरिपू) या कंपनीचे कार्यकारी संचालक म्हणून अनेक ऐतिहासिक कामे केली तसेच देशात अनेक पायाभूत सुविधा उभारल्या, ज्याचा फायदा आज महाराष्ट्र व देशाला होत आहे. या कंपनीचा उद्देश केवळ व्यवसाय करून नफा मिळवणे हा नव्हता तर या सामाजिक सुधारणांसाठी आवश्यक ते पाठबळ मिळावे हा मुख्य उद्देश होता. महात्मा फुले यांनी उद्योग, अर्थकारण, समाजकार्य यांचा योग्य समन्वय साधला. त्यांनी उभारलेल्या या प्रकल्पांची आणि चळवळींची गरज आजच्या भारतीय समाजाला आहे. आधुनिक भारताच्या औद्योगिक विकासासाठी महात्मा फुले यांचे विचार, कार्य दिशादर्शक व प्रेरणादायी ठरतील, असा विश्वास वाटतो.

महात्मा फुले यांनी आपल्या 'पुणे कमर्शियल आणि कॉन्ट्रॅक्टिंग कंपनी' द्वारे अनेक मोठे व सार्वजनिक प्रकल्प पूर्णत्वास नेले. त्यांनी पुण्याहून साताऱ्याला जाणारा 'कात्रजचा बोगदा', पुणे शहराकडून नगरकडे किंवा संभाजीनगर मार्गावरील 'बंड गार्डनचा पुल' बांधला आहे. बंडगार्डनला आणि येरवड्याला जोडणारा मुळा-मुठेवरचा ब्रिटीशकाळातील पूल सन १८६७ साली बांधला. या पुलाचे आयुष्य १०० वर्षांचे होते. प्रत्यक्षात तो १४० वर्षे वापरात आला. आजही तो भक्कमअवस्थेत उभा आहे. फक्त सुरक्षिततेसाठी सध्या तो रहदारीला बंद करण्यात आला आहे. आज पुणे महानगर पालिकेच्या हेरिटेज विभागाने तेथे एक भव्य 'आर्ट प्लाझा' उभारला आहे. सन १८६७ साली 'फिट झेराल्ड ब्रिज', तसेच 'खडकवासला धरणाचा डावा कालवा'. पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनीने बांधला. अशी मोठी कामे महात्मा फुले यांनी या कंपनीच्या माध्यमातून केली. ही कंपनी केवळ कॉन्ट्रॅक्टच घेत होती असे नव्हे, तर ह्या कंपनीच्या माध्यमातून महात्मा फुले यांनी अनेक पुस्तके प्रकाशित केली. १८६५ मध्ये तुकाराम तात्या पडवळ यांचे 'जातीभेद विवेकसार' हे पुस्तक प्रकाशित केले, तसेच बौद्ध विचारवंत 'अश्वघोष' यांच्या 'वज्रसूची' हा ग्रंथ प्रकाशित करून लोकांपर्यंत पोहोचवले. पुण्यात त्यांनी एक पुस्तक विक्री केंद्रही उभारले होते, या केंद्राने समाजप्रबोधनाची मोठी भूमिका बजावली. आपल्या देशातील महिलांना सोन्याची खूप आवड आहे असे म्हणतात. हे दागिने तयार करण्यासाठी जे सोन्याचे 'मोल्ड्स' साचे लागतात, ह्या मोल्ड्सची संपूर्ण मुंबई प्रांताची होलसेल एजन्सी महात्माजींच्या 'पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनीकडे' होती. त्यावेळी मुंबई प्रांतामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात व सिंध हे भाग होते. या कंपनीच्या माध्यमातून आणखीन एक काम महात्मा जोतिबा फुले करत, ते म्हणजे पुण्याच्या हडपसर परिसरातून फळे, भाजीपाला रेल्वेने ते मुंबई येथील 'भाईखळा भाजी मार्केटला' पाठवले जात असत. त्यामुळे पुढे भाईखळा मार्केटला 'महात्मा जोतिबा फुले' यांचे नाव देण्यात आले. या कंपनी तर्फे करण्यात आलेले आणखीन एक काम म्हणजे, वेगवेगळ्या शिक्षण संस्था स्थापन करने, त्या संस्था चालवणे, त्याच्या माध्यमातून वेगवेगळे उपक्रम राबवणे, वाचनालय स्थापन करने ही कामे आदी संस्था व कंपनी करत असे.

त्यांचे एक सहकारी तसेच 'पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनी'मधील भागीदार पोलास राजा लिंगू यांनी कॅम्प एज्युकेशन सोसायटीची स्थापना जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या मदतीने सन १८८५ साली मुंबई येथे सुरू केली. ही संस्था आज देखील कार्यरत आहे. महात्मा फुले यांचे आणखीन एक सहकारी व्यंकु कालेवार जे त्यांच्या 'पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनी'मध्ये भागीदार होते. त्यांनी सन १८८९ ते १८९६ या काळात मुंबई येथील महानगरपालिकेची ईमारत बांधली होती. रामय्या व्यंकय्या आय्यावरू यांनी देशातले सर्वात जुने 'भंडारदरा धरण' हे 'पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनी'च्या माध्यमातून बांधले होते. बडोद्याचे सयाजीराव गायकवाड यांचा 'लक्ष्मी विलास' नावाचा राजवाडा सुद्धा त्यांच्या 'पुना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनी'ने बांधला होता. महात्मा फुले सात वर्ष पुणे आयुक्त पदावर होते. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक महत्वपूर्ण कामे केली. त्यापैकी त्यांनी बंद नळाद्वारे पाणी पुणे शहरात आणून ते शुध्द करून नळाने देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले होते. त्या काळी अशुद्ध पाण्याची समस्या खूप मोठी होती. त्यांनी खडकवासला धरणातून शेताकडे पाणी नेण्यासाठी कॅनॉल देखील बांधले. तसेच पुणे शहरात प्रत्येक पेठेमध्ये किमान 'एक दवाखाना' व किमान 'एक शाळा' असली पाहिजे, असा महत्वाचा निर्णय घेतला होता. या प्रकल्पांद्वारे जोतीरावांनी आधुनिक स्थापत्यशास्त्र आणि औद्योगिक व्यवस्थापनाची पायाभरणी केली. यामुळे देशातील औद्योगिक प्रगतीला चालना मिळाली आणि भारताच्या आर्थिक विकासाला बळकटी मिळाली.

आजच्या काळातील बहुतेक उद्योगपती फक्त आर्थिक नफा मिळवण्यासाठी उद्योग करतात, मात्र महात्मा फुले यांचे उद्योग व व्यवसाय हे समाजउभारणी, समाज सुधारणेसाठी होते. जोतीराव फुले यांनी आपल्या कंपनीद्वारे मिळवलेल्या नफ्यातील बहुतांश रक्कम सामाजिक सुधारणा आणि शिक्षणासाठी खर्च केली. स्त्री-शिक्षण, शेतकरी उद्धार, जातिनिर्मूलन, सामाजिक चळवळींसाठी आपली सर्व 'स्वकष्टार्जित संपत्ती' खर्च केली. आज 'बिल्डर' हा शब्द प्रामुख्याने बांधकाम व्यावसायिकांसाठी वापरला जातो. मात्र, महात्मा फुले 'नेशन बिल्डर' 'राष्ट्रनिर्मिते' होते. त्यांनी केवळ इमारती, पूल, धरणे बांधली नाहीत, तर शेती, शिक्षण, समता, ममता, मानवता, बंधुता, सामाजिक न्यायाच्या विचारांची पायाभरणी करून सामाजिक व आर्थिक परिवर्तनाची चळवळ उभारली. महात्मा फुले यांनी 'शेअर मार्केट', भारतीय कृषी अर्थशास्त्रावरही लेखन केले आहे. भारताला औद्योगिक व्यवस्थापनाचा एक आदर्श घालून दिला आहे.

'पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनी' याची त्याकाळात वार्षिक उलाढाल त्याकाळात टाटा यांच्यापेक्षा जास्त होती. सन- १८६९ साली टाटा यांच्या कंपनीची वार्षिक उलाढाल २००००/- रुपये होती, तर महात्मा फुले यांच्या 'पूना कमर्शिअल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनीची' वार्षिक उलाढाल ही २१०००/- रुपये होती. म्हणजेच तेव्हा ते टाटापेक्षा श्रीमंत होते. महात्मा फुले यांनी मिळविलेला नफा सामाजिक कामांसाठी मुक्तहस्ते खर्चून टाकला. ही स्वकष्टार्जित संपत्ती खर्चून जोतीरावांनी तहहयात समाजकार्य केलं. आजच्या काळातील उड्ळ (उॅीिेीरींश डेलळरश्र ठशीिेपीळलळश्रळीूं) चे मूळ जनक महात्मा जोतीराव फुले यांच्या विचारातच दडलेले आहे. आपण २०१३ (उेािरपळशी -लीं, २०१३) च्या कलम १३५ अंतर्गत सरासरी नफ्याच्या २% खर्च करणे कंपन्यांना बंधनकारक केली आहे. उड्ळ खर्च न केल्यास आर्थिक दंड आणि कायदेशीर दंडाची तरतूद केली आहे. असा कोणताही कायदा नसताना महात्मा फुलेंनी आपल्या नफ्यातील १०० % वाटा सामाजिक उत्तरदायित्वासाठी खर्च केला आणि समाजक्रांतीचे जनक ठरले. आजपर्यंत भारताच्या इतिहासात आपल्या कंपनीच्या नफ्यातील एवढा मोठा वाटा समाजकार्यासाठी लावणारे महात्मा फुले हे एकमेव समाज क्रांतीकारक आणि उद्योजक आहेत. हा इतिहास कोणीही खोडू शकत नाही किंवा जगातील कोणताही उद्योजक व व्यावसायिक हा विक्रम मोडू शकेल किंवा गाठू शकेल असे मला वाटत नाही. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना आपला गुरू मानले, महात्मा गांधींनी त्यांना देशातील पहिले खरे महात्मा असे गौरवले, तर स्वातंत्र्यवीर सावरकरांनी त्यांना समाज क्रांतिकारक म्हणून संबोधले. तीन भिन्न वैचारिक विचारवंतांनी महात्मा फुल्यांचा यथोचित सन्मान आणि गौरव केला, ही बाब फुले यांच्या 'महात्मा' उपाधीची व द्रष्टेपणाची साक्ष देते. त्यांचा वारसा केवळ सामाजिक सुधारक म्हणून नव्हे, तर एक द्रष्टे उद्योजक, कृषी व अर्थतज्ज्ञ म्हणूनही ओळखला गेला पाहिजे. आजच्या उद्योजकांनी, समाजसुधारकांनी महात्मा फुले यांच्या विचार, कार्यातून प्रेरणा घेत, उद्योग - व्यवसायातून मिळालेला नफा समाजहित, कार्य, समाजउद्धारासाठी वापरता येतो, याचे उत्तम उदाहरण घालून द्यावे. महात्मा फुले यांचे वैचारिक अनुयायी व्हावे...! हीच महात्मा फुले यांना खरी आदरांजली ठरेल...! असे मला वाटते.



डॉ. प्रकाश खेत्री
छ. संभाजीनगर

# बांधकाम कामगारांच्या नोंदणीच्या नुतनीकरणासाठी लिंबागणेश येथे नागरिकांचे रास्तारोको आंदोलन

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड पंचायत समितीच्या एका आदेशाने बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे नुतनीकरण गेल्या ९ महिन्यांपासून रखडले असुन बांधकाम कामगार (नुतनीकरण) पुन्हा नोंदणी करणे आवश्यक असुन प्रत्येक वर्षी नोंदणी करणे गरजेचे आहे मात्र यासाठी ९० दिवस काम चहा यांची सही घ्यावी लागते. मात्र गटविकास अधिकारी यांच्या आदेशानुसार ग्रामविकास अधिकारी सही देत नाहीत. त्यामुळे शासनाच्या बांधकाम कामगार विकास महामंडळ या योजनेंतर्गत विविध कल्याणकारी योजना जसे की कामगारांच्या मुलांना व कुटुंबियांना मिळणाऱ्या मुला मुलींच्या शिक्षणासाठी मदत, सामाजिक सुरक्षा, आर्थिक मदत, आरोग्य सुविधा यापासून वंचित असुन शासन स्तरावरून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या आधिकाऱ्यांना ग्रामसेवकांना स्वाक्षरी देण्यास आदेशित करून कामगारांची अडचण दुर करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१० गुरूवार रोजी अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान लिंबागणेश छत्रपती शिवाजी महाराज चौक याठिकाणी रास्तारोको आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे मागणी करण्यात आली असून निवेदन मंडळ अधिकारी श्रीधर साळुंके, तलाठी गणपत पोतदार, तलाठी शेख गफुर, पो. हे. संतोष राऊत, नवनाथ मुंढे, मधुकर तांदळे यांनी स्विकारले.

यावेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, राजेभाऊ गिरे, बाळकृष्ण थोरात, दामोदर थोरात, रमेश गायकवाड, पांडुरंग वाणी विक्रांत वाणी, रामकिसन गिरे, दादा गायकवाड, शेख खाजु, बांधकाम मिस्त्री सय्यद रफिक, सुधाकर बागल, सय्यद सलीम, सय्यद अकबर, सय्यद आयुब, विलास जाधव, शेषेराव तागड, श्रीराम तागड, भिमराव बोराटे, बंकट लगास, हनुमान अंकुशे, शिवराम गायकवाड, तुकाराम गायकवाड, बन्सी निर्मळ, रामदास निर्मळ, सुधीर क्षीरसागर, सय्यद रियाज, बाळकृष्ण अंकुशे, बंकट लगास, सय्यद फैय्याज आदी सहभागी होते.



## पंचायत समितीच्या आडमुठेपणामळे नुतनीकरण रखडले


महाराष्ट्रातील बांधकाम कामगार हे राज्याच्या पायाभूत सुविधांच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात.रस्ते, ईमारती, पुल आणि इतर अनेक बांधकाम प्रकल्पांवर काम करतात हे काम अतिशय कठीण धोकादायक असते. कामगारांमध्ये पुरूष आणि महिला दोघेही समाविष्ट असतात. बांधकाम क्षेत्रातील कामगार हे बहुतांश वेळा असुरक्षित, असंघटित आणि अल्पशिक्षित असतात तसेच त्यांना नियमित रोजगार, आरोग्य सुविधा, सामाजिक सुरक्षा आणि आर्थिक स्थैर्य मिळत नाही याच कारणांमुळे महाराष्ट्र सरकारने बांधकाम कामगारांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ सारख्या संस्थांची स्थापना केली. या मंडळामार्फत विविध क्षेत्रातील बांधकाम कामगारांची नोंद केली जाते. बांधकाम कामगार योजनेंतर्गत नोंदणीकृत कामगारांसाठी ८४ प्रकारच्या विविध योजना राबविल्या जातात. ज्यामध्ये सामाजिक सुरक्षा योजना, शैक्षणिक योजना, आरोग्य विषयक योजना, आर्थिक योजनांचा समावेश आहे. बांधकाम कामगारांना या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन किंवा आफलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.

बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे नूतनीकरण दरवर्षी करणे बंधनकारक आहे. त्यासाठी ९० दिवस काम केल्याच्या प्रमाणपत्रावर ग्रामीण भागात ग्रामविकास अधिकारी यांची सही घ्यावी लागते. मात्र गटविकास अधिकारी पंचायत समिती बीड यांच्या आदेशानुसार ग्रामविकास अधिकारी सही देत नाहीत. त्यामुळे पंचायत समितीच्या या एका आदेशाने बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे नूतनीकरण रखडले असून शासनाच्या बांधकाम कामगार विकास महामंडळाच्या योजनेअंतर्गत विविध कल्याणकारी योजना पासून बांधकाम कामगार व त्यांचे कुटुंबे वंचित आहेत. त्यामुळे शासन स्तरावर जिल्हा परिषद व पंचायत समितीचे अधिकाऱ्यांना ग्रामसेवकांना स्वाक्षरी देण्यास आदेशित करून कामगारांची अडचण दूर करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

# फिरता नारळी सप्ताह म्हणजे राष्ट्रीय संत भगवान बाबांचे विचार सर्व दूर पोहोचविणारा : प्रा.डोईफोडे

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय संत भगवान बाबा यांनी सुरू केलेला नारळी सप्ताह आज भगवान गडाचे महंत श्री नामदेव शास्त्री महाराज यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या उत्साहात पिंपळनेर येथे सुरू झालेला आहे.






यानिमित्ताने प्रसिद्ध पत्रकाद्वारे डोईफोडवाडी चे माजी सरपंच व श्याम माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात ज्ञानदानाचे कार्य करणारे तात्यासाहेब डोईफोडे यांनी म्हटले आहे की राष्ट्रीय संत भगवान बाबा यांनी हा सप्ताह ९१ वर्षा पूर्वी सुरू केलेला आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून बाबांनी लोकांना बंधू भावाची सामाजिक एकोप्याची शिकवण दिली. त्यांनी शिक्षणालाही अनन्यसाधारण महत्त्व दिले होते. प्रत्येकाने आपल्या मुलांना शिक्षण देऊन सुसंस्कारित बनवावे हा संदेश त्यांनी दिला. या सप्ताहात त्याही काळात आणि आजही सर्व जाती धर्माचे लोक एकत्रित येऊन निष्ठेने तनाने, मनाने आणि धनाने बाबांची आणि ईश्वराची सेवा करतात आज हा सप्ताह भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री महाराज यांच्या नेतृत्वाखाली पिंपळनेर तालुका शिरूर येथे गावकऱ्यांच्या आणि परिसरातील सर्व लोकांच्या सहकार्यातून दिव्य आणि भव्य स्वरूपात होत आहे.

या सप्ताहातून नामदेव शास्त्री महाराज राष्ट्रीय संत भगवान बाबांचा सामाजिक सलोख्याचा शिक्षणाचा आणि अध्यात्माचा विचार गावोगावी तळागाळातील माणसापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम करतायेत म्हणजेच फिरता नारळी सप्ताह सामाजिक सलोखा आणि बंधुभाव निर्माण वृद्धिंगत करणारा आहे, असे सरपंच प्राध्यापक तात्यासाहेब डोईफोडे सर यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

# गोकुळ बाबुराव कोठुळे यांचे दुःखद निधन

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील वांगी येथील रहिवासी गोकुळ बाबुराव कोठुळे (वय ३० वर्षे) यांचे उपचारादरम्यान दुःखद निधन झाले आहे. काही दिवसांपूर्वी त्यांचा अपघात झाला होता त्यांची प्रकृती खालावल्याने त्यांना गॅलेक्झी हॉस्पिटल, संभाजीनगर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, वैद्यकीय शर्थीचे प्रयत्न करूनही ८ एप्रिल २०२५ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली.



गोकुळ कोठुळे हे अत्यंत मनमिळावू, शांत आणि कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात होते. त्यांचे गावात तसेच परिसरातही अनेक मित्रपरिवार होते. सामाजिक कार्यात ते सदैव पुढाकार घेत असत. त्यांच्या अचानक निधनाने वांगी गावासह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. गोकुळ बाबुराव कोठुळे यांना भावपूर्ण श्रद्धांजली! ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि परिवाराला या दुःखातून सावरण्याची शक्ती देवो.

# जिल्ह्याचे नाव आरोग्य विभागात राज्यात प्रथम आणणारे डॉ. राधेश्याम जाजू यांचा गौरव

बीड । प्रतिनिधी

जागतिक आरोग्य दिनानिमित्त ७ एप्रिल रोजी राज्यातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली व अंधत्व निवारण व मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्याबद्दल बीडचे जिल्हा नेत्र विभागाचे आरोग्य अधिकारी डॉ. राधेश्यामजी जाजू व त्यांच्या टीमने ग्रामीण भागातील रुग्णालयात जाऊन संपूर्ण नेत्रदीपक कामगिरी करून महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. दिनांक ७ एप्रिल २०२५ रोजी जागतिक आरोग्य दिनी यशवंतराव चव्हाण सभागृह, मुंबई येथे कार्यक्रम संपन्न झाला.



त्याबद्दल गौरवण्यात आले त्याबद्दल शिवसेना व धांडे परिवाराच्या वतीने डॉ. राधेशाम जाजू यांचा यथोचित सत्कार शिवसेनेचे जिल्हा संघटक नितीन भैया धांडे यांच्या हस्ते सत्कार सोळा संपन्न झाला. यावेळी बीड जिल्हा आरोग्य अधिकारी स्त्री रोग तज्ञ डॉ. नारायण गाडे, डॉ.संजय जाणवळे, उपजिल्हाप्रमुख हनुमान जगताप, राजू महूवाले, सुरेश शेटे, ओम खवतड, माजी नगरसेवक बाबुराव परळकर, उपतालुका प्रमुख शिवाजी तीपाले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आला. यावेळी शिवसेना व धांडे परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बार्टी कडून महावीर जयंती आणि डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख स्मृतिदिन निमित्त अभिवादन कार्यक्रम



वसमत । प्रतिनिधी

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संशोधनव प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे प्रकल्प अधिकारीप सिद्धार्थ गोंवदे सर यांच्या मार्गदर्शनाखाली समतादूत गुरुनाथ गाडेकर, मिलिंद आळणे सर्व प्रथम महावीर जैन धर्माची संस्थापक व भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉक्टर कुंटे हे होते तर प्रमुख पाहुणे बसवंते साहेब हे होते.

आज संपूर्ण देशात महावीर जयंती साजरी करण्यात येत आहे. भगवान महावीर यांच्या अहिंसा, सत्य आणि संयम यांच्या शिकवणीचा स्मरण केले पाहिजे. याच दिवशी डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांचा स्मृतिदिन देखील आदरपूर्वक साजरा करण्यात येतो. आधुनिक भारतातील शेतकरी कल्याणाचे जनक मानले जाणारे डॉ. देशमुख यांनी कृषी शिक्षण, संशोधन आणि ग्रामविकासासाठी मोठे योगदान दिले. या दोन्ही पर्वांनी समाजात शांतता, सेवा आणि प्रगतीचा संदेश दिला आहे. यावेळी इंगळे सर गायकवाड साहेब राजेश इंगळे, विश्वास गव्हाणे, प्रणव आळणे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




पत्रकार सुरेश कांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त दादेगाव येथील सरपंच भाऊसाहेब कोकरे, भरत पोकळे, अरुण घुमरे, लुळा बायकर, नाना शेठ घुमरे आदी मान्यवर यांनी सत्कार केला.

# कडाक्याच्या उन्हात पत्राच्या शेड मधील शाळेतील विद्यार्थ्यांचे हाल



## उष्माघाताचे प्रमाण वाढले

धारूर । प्रतिनिधी

सध्या दिवसेंदिवस उन्ह फार कडक पडत असल्यामुळे उष्माघताचे प्रमाण वाढत आहे. सध्या धारूर शहरांमध्ये पत्रांच्या शेड मधील शाळांची संख्या ही जास्त आहे याच शाळेतील विद्यार्थ्यान मध्ये उष्माघाताचे प्रमाण वाढलेले दिसून येत आहे. सध्या सर्वे केला तर दवाखान्या मधील जास्तीत जास्त रुग्ण हे पत्राच्या घरातील व पत्राच्या शेड मधील शाळातील आढळून आलेले दिसून येतायेत, लहान मुलांना उन्हाच्या तिवृतां जास्त जाणवत आहेत.

उलटी, जुलाब व थकवात पणाचे रुग्ण सध्या वाढत आहेत. त्यामुळे लहान मुलांना आजाराच्या सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे शाळेतील लहान मुलांसाठी पंखा किंवा थंड हवेची सोय करण्यात यायला पाहिजे पण तसे दिसून येत नाही. शाळेतील मुलांसाठी कडाक्याच्या उन्हात आजार टाळण्यासाठी सोय करणे अत्यंत गरजेचे असून ते कोणत्याही शाळेत सोय सुविधा दिसत नाही.

## सिरसाळ्यात महात्मा ज्योतिबा फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव २०२५

# नालंदा अभ्यासिका केंद्र सिरसाळा या ठिकाणी भव्य उद्घाटन सोहळा

सिरसाळा । प्रतिनिधी

दिनांक ११ रोजी शुक्रवार या दिवशी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती उत्सव समितीच्या वतीने नालंदा अभ्यासिका केंद्र भव्य उद्घाटन सोहळा आयोजित केला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष आयु. अश्रुबा (जिजा) किरवले यांच्या अध्यक्षतेखाली हा उद्घाटन सोहळा होणार आहे. सिरसाळा परिसरामध्ये विद्यार्थ्यांसाठी एमपीएससी च्या सर्व विद्यार्थ्यांना स्वतंत्र बसण्याची व्यवस्था विद्यार्थ्यांना केलेली आहे. त्यामध्ये फर्निचर लाइटिंग असं बरेच सुविधा नालंदा अभ्यासिका केंद्र मध्ये उपलब्ध केल्या आहेत.

विनामूल्य क्लासेस व स्टडी व अभ्यास करण्यासाठी या सिरसाळा गावचे भूमिपुत्र व उपजिल्हाधिकारी (मुंबई) आयु. महादेव किरवले. साहेब यांच्या प्रयत्नातून नालंदा अभ्यासिका केंद्र सम्राट अशोक बुद्ध विहार कुशीनगर सिरसाळा या ठिकाणी सुरू करण्यात येत आहे. तसेच या नालंदा अभ्यासिका केंद्राचे उद्घाटक म्हणून चेतना तिडके (अप्पर पोलीस अध्यक्ष अंबाजोगाई) यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती व प्रमुख पाहुणे म्हणून सिरसाळा पोलीस ठाण्याचे एपीआय



गोरखनाथ दहिफळे व पीएसआय आनंद जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

महात्मा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त लहान वयोगटातील मुलं व मुली यांनी भीम गीत लेझीम संघ मुलींचा डान्स रांगोळी स्पर्धा निबंध स्पर्धा असे बरेच काही खेळ जयंती निमित्त घेत आहेत. आठ ते दहा दिवसापासून सामाजिक उपक्रम चालू केले आहेत. यामध्ये सामाजिक व धार्मिक यामध्ये राज्यस्तरीय खुली निबंध स्पर्धा राबविण्यात येत आहे. यामध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक ९०००, दुतीय पारितोषिक ७००० रुपये, तृतीय पारितोषिक ५००० रुपये या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना पारितोषिक म्हणून प्रमाणपत्र भेटणार आहे. ज्यांनी रात्र आणि दिवस मेहनत घेतली. यावेळी राज्यस्तरीय खुली निबंध स्पर्धेचे आयोजक आनंद किरवले, अमोल किरवले, शाहीर बाबा किरवले यांनी खूप परिश्रम घेऊन विद्यार्थ्यांना खूप छान असे भीम गीताच्या तालावर व लेझीम च्या तालात भीम गीतांचा सूर मिसळला आहे.

एक ते अठरा वय गटातील मुलं आणि मुलीं हे जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त १७.४.२०२५ रोजी सिरसाळा या ठिकाणी भीम जयंती होत असते ह्या जयंतीचा आदर्श परिसरातील भीमसैनिक घेत असतात. त्याच पद्धतीने खेडेपाड्यामध्ये भीम जयंती जोरात केली जाते यावेळी उद्घाटन प्रसंगी बोलताना चेतना तिडके अप्पर पोलीस अध्यक्ष अंबाजोगाई, चक्रवर्ती अशोक सम्राट बुद्ध विहार कुशी नगर सिरसाळा येथे उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करणार आहेत. याची परिसरातील विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे नालंदा अभ्यासिका केंद्र सिरसाळा येथे उपस्थित राहावे ही नम्र विनंती करण्यात येत आहे. याचवेळी आचार्य टाकळी येथे महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती उत्सव समितीने रक्तदान शिबिर घेण्याचे आयोजित केले होते. याचवेळी रक्तदान युवा कार्यक्रम घेण्यात आले आहे. यावेळी उपस्थित गावचे सरपंच उपसरपंच व रक्तदान करणारे युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी यावेळी माऊली आचार्य एमडी काळे, बाळासाहेब घोडके, गजानन घोडके, महादेव खोडवे, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर खोडवे, तुकाराम खोडवे, केतन किरवले, मधुकर किरवले, यावेळी दैनिक आरंभ चे परळी तालुका प्रतिनिधी बापू किरवले उपस्थित होते. अंबाजोगाई येथील एसआरटी हॉस्पिटलचे सर्व टीम उपस्थित होते. त्यांचाही सत्कार करण्यात आला आहे.

# ग्रामपंचायतच्या दुर्लक्षामुळे दलित व मुस्लिम वस्तीतील महिलांचा आक्रोश

## माळेवाडी येथील नागरीकांचे पाण्यासाठी हाल, जलजीवन मिशन योजना नावालाच

माजलगांव । प्रतिनिधी

**दलित वस्तीच्या विकासासाठी शासनामार्फत अनेक योजना राबविल्या जातात लाखो रुपये खर्च केले जातात पण या योजना दलितांपर्यंत पोहोचत नाहीत कागदोपत्री या योजना राबविल्या जातात. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर आजही येथील दलितांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो हि खूप मोठी शोकांतिका आहे.**



माळेवाडी येथील दलित व मुस्लीम वस्तीतील नागरिकांचे पाण्यासाठी हाल होत आहेत याकडे ग्रामपंचायत व सरपंच यांच्याकडून दुर्लक्ष होत आहे. पाणी पुरवठा करणाऱ्या शिपायाला पाण्याविषयी विचारपूस केली असता अरेरावीची व मुजोरीची भाषा करण्यात येते सरपंच नरवडे यांना चौकशी केली असता काय करायचं ते करा असे येथील ग्रामस्थांचे म्हणणे आहे. दैनिक आरंभचे प्रतिनिधी प्रतिक्रीया घेण्यासाठी गावात गेले असता ग्रामपंचायत विरोधात गावातील महिलांना आक्रोश केला. या गावातील महिलांनी सांगितले की एक ते दोन किलोमीटर वरून पाणी आणावे लागते आणि कडाक्याच्या उन्हाळ्यामध्ये पाहण्यासाठी आमचे हाल होत आहेत. कडक उन्हात पाणी आणल्यामुळे लेकरं, महिला आजारी पडत आहेत. एक वयस्कर आजोबा पाण्यासाठी गेले असता पाय घसरून पडले व त्यांचा कान तुटलेला आहे तसेच एका महिलेला लांबून पाणी आणल्यामुळे डोक्याची नस दबली असून शारीरिक व आर्थिक नुकसान झालेले आहे या पाण्यामुळे नागरिकांचा बळीही जाऊ शकतो याला जबाबदार कोण.

ग्रामपंचायत कडे वारंवार तक्रार करूनही सरपंच ग्रामसेवक कसल्याही प्रकारची दखल घेतली जात नाही त्यामुळे तात्काळ पाण्याची व्यवस्था केली नाही तर माजलगाव पंचायत समिती कार्यालय समोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा येथील महिला व ग्रामस्थांनी दिला आहे. शासनाने जल जीवन अंतर्गत मिशन कोटयावधी रुपयाची योजना या गावांमध्ये आणली पण मागील दोन वर्षांपासून या योजनेचे बोगस रित्या काम चालू आहे अजून पण या योजनेअंतर्गत पाण्याचा थेंबही गावात आलेला आहे. फक्त बोगस काम दाखवून बिलं उचलले जातात ही योजना फक्त नावालाच आहे असे येथील महिला व ग्रामस्थांचे म्हणणे आहे त्यामुळे याची पण चौकशी होणे गरजेचे आहे.

# महावितरण कंपनीकडून अनियमित व कमी दाबाने विद्युत पुरवठा

## कारंजा टॉवर ते नुरी मस्जिद ते काली मस्जिद आणि बलभीम चौक ते कारंजा टॉवर परिसरातील नागरिक त्रस्त

बीड । प्रतिनिधी




महावितरण कंपनीकडून गेल्या काही महिन्यांपासून महावितरण कंपनीकडून अनियमित व कमी दाबाने विद्युत पुरवठा करण्यात येत असल्याने ऐतिहासिक कारंजा टॉवर ते नुरी मस्जिद ते काली मस्जिद आणि बलभीम चौक ते कारंजा टॉवर परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. महावितरण कंपनीचे अभियंता आणि कर्मचाऱ्यांनी या परिसरातील अनियमित विद्युत पुरवठा तसेच कमी दाबाने होत असलेल्या विद्युत पुरवठ्याचा सोक्षमोक्ष लावून विद्युत पुरवठा सुरळीत करावा असे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे. सध्या कडक उन्हाळ्याचे दिवस असल्याने सूर्य आग ओकत आहे. यामुळे सर्वांच्या जीवाची लाहीलाही होत आहे. अशा परिस्थितीमध्ये महावितरण कंपनीकडून विद्युत पुरवठा सुरळीतपणे सुरू ठेवणे अपेक्षित असताना या परिसरात २४ तासातून अनेकदा विद्युत पुरवठा खंडित होत आहे तसेच अत्यंत कमी दाबाने होत आहे. यामुळे विद्युत उपकरणे किंवा साहित्यांना नुकसान होत आहे. फ्रिज, कुलर, पाण्याच्या मोटारी, पंखे, टीव्ही, लॅपटॉप, असल्यास एसी यांचे नुकसान होत आहे. अनेकांची ही उपकरणे आतापर्यंत जळाली आहेत.

एवढेच नव्हे तर दहा वर्षांच्या प्रतीक्षेनंतर ऐतिहासिक कारंजा टॉवर समोरील सुरू करण्यात आलेले पाण्याच्या फवाऱ्यांवर सुद्धा याचा परिणाम होत आहे. कमी दाबाने विद्युत पुरवठा होत असल्याने येथील पाण्याचे फवारे अपेक्षित उंचीवर न जाता अर्ध्या उंचीवर जात आहे. या सर्व बाबींकडे महावितरण कंपनीचे अभियंता आणि विज बिल वसुली मोहीम साठी टिच्चून फिरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या चमुचे मात्र साफ दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. या सर्व प्रकारांमुळे या परिसरातील नागरिक आणि व्यापारी गेल्या काही महिन्यांपासून मेटाकुटीस आले असून होणाऱ्या नुकसानामुळे आणि उकाळ्यामुळे जाम वैतागले आहेत. तरी महावितरण कंपनीचे अभियंता आणि कर्मचाऱ्यांनी या परिसरातील अनियमित विद्युत पुरवठा तसेच कमी दाबाने होत असलेल्या विद्युत पुरवठ्याचा सोक्षमोक्ष लावून विद्युत पुरवठा सुरळीत करावा असे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

# धारूर नगरपरिषदेचे डोके ठिकाणावर आहे का?

## मुख्य रस्त्यावरील चालू बोअर बुजला आणि आता नव्या बोरचा अट्टाहास




धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर शहरामध्ये मुख्य रस्त्याचे काम सध्या धीमे गतीने चालू असल्याने नागरिकांना बाजारात फिरण्यासाठी किंवा रहदारीसाठी मोठा नाहक त्रास सहन करावा लागत आहे हा त्रास सहन करून सुद्धा नगरपरिषदेने मुख्य रस्त्यावरील मुख्य बाजारपेठेतील बालाजी मंदिरा जवळील चालू असलेले बोरवेल रस्त्याच्या कामासाठी क्रिसिन उकरून काढून ते बोरवेल बुजून टाकण्यात आलेले आहे.

सामाजिक कार्यकर्त्यांनी व पत्रकारांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना विचारले असता त्यांनी नवीन बोर करून घेऊ किंवा त्यालाच रिपेरिंग करू अशी उडवाउडवीची उत्तरे दिली आहेत यावरून असे लक्षात येते की नगर परिषदेचे व मुख्याधिकाऱ्यांचे चालू असलेल्या मुख्य रस्त्याच्या कामाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे. संबंधित रस्ता हे सा.बा.विभाग यांच्या अंतर्गत होत असल्याने नगरपरिषद प्रशासन पूर्णतः दुर्लक्ष करीत आहे कारण भरउन्हाळ्यामध्ये चालू बोर बंद करणे म्हणजे तोंडातला घास काढणे त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास होत आहे. कारण गेले दहा ते पंधरा वर्षापासून त्या बोरवरती बहुतांश लोक अवलंबून आहेत कारण नगरपरिषद किल्ले धारूर गावाला पाणी दहा ते वीस दिवसात एकदा येते व गरीब कुटुंबातील लोकांना पाणी विकत घेण्यासाठी परवडत नाही हे माहीत असताना सुद्धा नगरपरिषद प्रशासनाने अतिक्रमासोबत चालू बोर ही उकडून काढला त्यामुळे सर्व नागरिक पाण्याच्या नाहक त्रासाच्या वेदना भोगत असल्याचे सर्वत्र नागरिकांमध्ये चर्चा आहे.

# जयवंती नदी पात्रातील अतिक्रमणे काढा या मागणीसाठी अभिजीत लोमटे यांचे २१ एप्रिलपासून उपोषण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील जयवंती नदी पात्रातील अतिक्रमणे काढावीत अशी मागणी डिजिटल मीडिया परिषद अंबाजोगाई चे अध्यक्ष तथा संग्राम महाराष्ट्राचा न्यूजचे संपादक अभिजीत लोमटे यांनी माननीय महसूल आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे ई–मेल निवेदणाद्वारे केली आहे.

अंबाजोगाई शहर हद्दीतील जयवंती नदी ही ऐतिहासिक व पौराणिक असून पुरातन काळापासून अंबाजोगाई शहरवासी यांचे धार्मिक कार्यक्रम या नदीकाठावर पूर्वपारपासून होत होते अंबाजोगाई शहराचे नागरिकांचे श्रद्धास्थान असलेल्या जयवंती नदी ही शहरातील काही समाजकंटक यांनी पूर्णपणे गिळंकृत करून कागदपत्राची हेराफेरी करत नदीस नाला घोषित केला



आहे नदी पात्रात अनेक अनधिकृत बांधकाम करून धन दांडग्यांनी संगमत करून स्वतः देखील अनधिकृत कब्जा करून नदी गिळणकृत केली आहे वास्तविक पाहता महसूल व शासनाकडे संपूर्ण रेकॉर्ड असताना देखील राजकीय दबावामुळे सदरच्या अतिक्रमाला विरोध केला जात नाही या उलट स्थानिक महसुली अधिकारी शांत बसून एक प्रकारे अतिक्रमाला खतपाणी देत आहेत तहसीलदार अंबाजोगाई यांनी सदरची अतिक्रमणे त्वरित दूर करावीत.

शिवाय राजकीय पाठबळाच्या जोरावर नगरपरिषद मुख्याधिकारी यांनी नियमबाह्य पणे नदी पात्रात बांधकाम केलेल्या नियमबाह्य कामाची प्रशासनाने सदरच्या कामाची चौकशी करावी तसेच जयवंती नदीचे दस्तावेज अनधिकृतपणे फेरबदल करत जयवंती नदी चा नाला करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी महसूल आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे डिजिटल मीडिया परिषद अंबाजोगाई चे अध्यक्ष अभिजीत लोमटे यांनी केली असून जयवंती नदीपात्रातील अतिक्रमण न काढल्यास २१ एप्रिल पासून उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे.



बीड येथील मिलिया शाळेत लिपिकपदी अजमत खान मुसाखान यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांच्या सत्कार करताना शाळेचे मुख्याध्यापक फैसल चाऊस उपमुख्याध्यापक मुजाहिद चाऊस बदर सर शोएब सर समीर सर जुनेद सर व आदी शिक्षक दिसत आहेत.




# शिवछत्र परिवाराने आणले गोदावरी नदी पात्रात पाणी

## शेतकरी व नागरिकांनी अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांचे मानले आभार

गेवराई । प्रतिनिधी

गोदापट्टयातील शेतकरी व नागरिकांनी केलेल्या मागणीची दखल घेऊन जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांनी शासन दरबारी सातत्याने प्रयत्न केल्यामुळे गोदावरी नदी पात्रात नाथसागरातून पाणी सोडण्यात आले आहे. उन्हाळ्यात गोदावरी पात्र पाण्याने भरले असून जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक भाऊसाहेब नाटकर, मदन भुसारे यांच्यासह गोदापट्यातील सरपंच, पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी व नागरिकांनी माजी आमदार अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांचे आभार मानले आहेत.




याबाबत अधिक माहिती अशी की, गोदाकाठच्या गावांमध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली होती. गोदावरी नदी कोरडी पडली होती. जनावरांसह नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. याबाबत जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांच्या कडे गोदाकाठच्या शेतकऱ्यांनी आपला प्रश्न मांडला होता. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर गंभीर दखल घेऊन अमरसिंह पंडित यांनी शासन दरबारी प्रयत्न करुन हा प्रश्न चुटकीसरशी सोडवला आहे. जायकवाडी धरणाच्या पैठण उजव्या कालव्यातून गुळज येथील सी.आर. ३ व तळणेवाडी येथील सी.आर. ४ मधुन गोदावरी नदी पात्रात पाणी सोडण्यात आले आहे. यामुळे गेवराई व अंबड तालुक्यातील गोदाकाठच्या दोन्ही बाजुच्या शेतकरी व नागरीकांना या पाण्याचा फायदा झाला असून सर्व शेतकरी व नागरीकांनी आनंद व्यक्त केला आहे.





गोदापट्ट्यातील नागझरी ख खामगाव, सावळेश्वर, राक्षसभुवन सुरळेगाव व ईतर सर्व शेतकऱ्यांच्या वतीने अमरसिंह पंडित साहेब व आ. विजयसिंह पंडित यांनी गोदावरी नदी पात्रात पाणी आणल्या बद्दल शेतकऱ्यांनी आनंद साजरा केला.

तर ८ क्युबिक क्युसेक मिटर पाणी मिळाले असते : भाऊसाहेब नाटकर

या बाबत माहिती देताना जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक भाऊसाहेब नाटकर म्हणाले की, लोकनेते अमरसिंह पंडित व आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून गोदापटट्यातील सर्व नागरिकाच्या वतीने फक्त गेवराई तालुक्यांच्या मागणीनुसार तेवढेच पाणी सुटले, जसे गेवराई तालुक्यातील नागरिकांनी प्रस्ताव दिले तसेच अंबड तालुक्यातील नागरीकांनी प्रस्ताव दिल प्रस्ताव दिले होते परंतु त्यांनी विहित नमुन्यात प्रस्ताव न दिल्याने जास्तीचे पाणी त्यांना मिळाले नाही. गेवराई तालुक्यातील मागणीनुसार तेवढेच पाणी सुटले. अंबड तालुक्यातील नागरिकाच्या मागनी प्रमाणे पाणी आले असते तर पाथरवाला परिसराला फायदा झाला असता. वाळकेश्वर संगमजळगाव अगरनांदर व हिंगणगाव या भागातील शेतकऱ्यांनी जसा प्रस्ताव पाहिजे होता तसा त्यानी दिला नाही या कारणानी अंबड तालुक्यातील नागरीकाची मागणी तसीच राहीली. पाहिजे त्या नमुन्यामधे प्रस्ताव दाखल केल्यामुळे ३ क्युबिक क्युसेक मिटर पाणी सुटले.

अंबड तालुक्यातील नागरीकांचा प्रस्ताव आला असता तर ८ क्युसिक मिटर पाणी सुटले आसते आणि शहागडच्या बंधारावरुध पाथरवाला बंधारा पर्यंत पाणी आले आसते अशी प्रतिक्रिया जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक भाऊसाहेब नाटकर यांनी यावेळी दिली. गोदावरी नदी पात्रातील शहागड को.प.बंधाऱ्यांचे बॅरेज मध्ये रुपांतर करण्याची मागणी आपण आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या कडे केली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT